

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

।। यः क्रियावान् स पण्डितः ।।

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. संजयकुमार एन. दळवी
एम.एस्सी., पीएच.डी.
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्रं. विकम/२०१४–१५/ 303 दि. ५/९/२०१४

मा. प्राचार्य/संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय:– विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या प्रतिसादाबाबत...........

महोदय/महोदया,

विद्यार्थी कल्याण मंडळ अंर्तगत वेगवेगळे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी वर्षभर राबविले जातात. सदर उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी महाविद्यालयामध्ये/ मान्यताप्राप्त संस्थेत या विभागाकडुन विद्यार्थी कल्याण अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तथापी विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया उपक्रमांसाठी विशेष प्रयत्न करणे, विद्यार्थी सहभाग वाढविण्यासाठी त्यांना प्रेरित करणे आदी त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. तरी आपणास सुचित करण्यात येते की, विद्यार्थी कल्याण अधिकारी यांना दिलेली मान्यता व अनुभव प्रमाणपत्र तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी मानधन अदा करताना या उपरोक्त प्रयत्नांची विशेष दखल घेण्यात येणार आहे. तसेच या विभागातून देण्यात येणारी प्रस्तावाची मान्यता, वित्तीय सहाय्य आदी महाविद्यालयाच्या/विद्यापीठ पातळीवरील उपक्रम/योजना या मधील सहभाग यांचाही विचार प्राधान्यक्रमाने करण्यात येईल. विद्यार्थी हिताच्या कल्याणकारी योजना आपणा सर्वाच्या सहकार्यानेच यशस्वीपणे राबविणे शक्य आहे.

आपण हे कार्य सर्वाच्या सहकार्याच्या माध्यमातुन अधिक गतिशील करुया!

प्रत माहितीसाठी:
आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी (S.W.O.)

5/9/14

संचालक
विद्यार्थी कल्याण मंडळ.

विद्यार्थी कल्याण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११००७.
☎ ०२०–२५६०११६०, ६५००३७००/०१ फॅक्स : ०२०–२५६०११५४ मो.: ९८५००१४४६६